MAHATMA GANDHI MISSION
MAHATMA GANDHI MISSION
# College of Agricultural Biotechnology
(ISO 9001: 2015 & ISO 14001 : 2015 Certified)
(Affiliated to Vasantrao Naik Marathwada Krishi Vidyapeeth, Parbhani)
MGM Hills, Gandheli, Aurangabad

No. MGM/CABT/138/2023

Date: 14/02/2023 ~~१४/०२/२०२३~~

प्रति

**मा .विद्यार्थी कल्याण अधिकारी**
वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ
परभणी, महाराष्ट्र

**विषय** : सन - २०२३ चा राष्ट्रीय सेवा योजनेचा अहवाल मराठी विहित नमुन्यात पाठवणे बाबत

**संदर्भ** : १. मा. विद्यार्थी कल्याण अधिकारी, रासेयो समन्वयक, वनामकृवि, यांचे पत्र दिनांक- ३/०२/२०२३
२. पत्र - क्र. २०२३. क्र. येएसएम/रासेयो/ १३८०/२०२३

**महोदय,**

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येत आहे कि, **सन २०२२-२३** या शैक्षणिक वर्षात महात्मा गांधी कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, गांधेली येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे विविध उपक्रम राबवण्यात आले यामध्ये यात औरंगाबाद शहरातील विविध सेवाभावी संस्था , नागरिक, प्रशासन ,अधिकारी, तसेच शाळकरी मुलांचा चांगला प्रतिसाद मिळाला. यात प्रामुख्याने वृक्षारोपण, उद्योजकता आणि कौशल विकास कार्यक्रम, शासनाच्या विविध योजना विषयक मार्गदर्शन, आरोग्य विषयक कार्यक्रम, प्रगतशेती, परिसर स्वछता अभियान, पर्यावरण संवर्धन, रक्तदान तसेच अवयवदान बदल जागरूकता, युवा दिन , व्यसनमुक्ती ,इत्यादी विषयावर प्रात्यक्षिक, बौद्धिक विचारमंथन, पथनाट्य, गटचर्चा इ मार्फत जनजागृती करून तसेच व्याख्यानाचे आयोजन या दिवसांत करण्यात आले आहे. ७६ व्या स्वातंत्र्य दिनाच्या स्मरणार्थ झालेल्या नियमित बैद्धिक विचारमंथनातून **आझादी का अमृत महोत्सव** अंतर्गत महाविद्यालयात नियमित राष्ट्रगीताचे सामूहिक गायनाची सुरुवात देखील माहाविद्यालयात रा स यो च्या स्वयंसेवकडून तसेच विद्यार्थीकडून सुरुवात झाली. महाविद्यालयाचे विशेष शिबीर आडगाव येथे ९ जानेवारी २०२३ ते १५ जानेवारी २०२३ येथे घेण्यात आले या शिबिरात **युवकांचा ध्यास ग्राम शहर विकास** याच्या माध्यमातून गावात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले यामध्ये रक्तदान शिबीर,वृक्षारोपण,पर्यावरण संवर्धन,बालविवाह आणि स्वछता संदर्भात प्रबोधन अश्या विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वरील सर्व कार्यक्रमासाठी एमजीएम गांधेली हिल्स चे संचालक सुदाम पवार, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एन आर चव्हाण यांचे विशेष मार्गदर्शक लाभले, तर सर्व कार्यक्रमाच्या आयोजन आणि व्यवस्थापणासाठी कार्यक्रम अधिकारी श्री आर आर तहकिक यांनी प्रयत्न केले आहेत.

या सर्व कार्यक्रमाचा अहवाल हार्ड कॉपी आणि तसेच सॉफ्ट कॉपी सोबत पाठवत आहोत

14/2/23
प्राचार्य
प्राचार्य
महात्मा गांधी मिशन
कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय
गांधेली, औरंगाबाद

कार्यक्रम अधिकारी
कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
महात्मा गांधी मिशन
कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय
औरंगाबाद

MGM College of Agricultural Biotechnology, Gandheli, Aurangabad

**MAHATMA GANDHI MISSION'S**

**COLLEGE OF AGRICULTURAL BIOTECHNOLOGY**

**(Affiliated to Vasantrao Naik Marathawada Krishi Vidhyapith)**

**MGM HILLS GANDHELI AURANGABAD,431003**

# राष्ट्रीय सेवा योजना

# वार्षिक अहवाल आणि विशेष शिबीर अहवाल २०२२-२३




**कार्यक्रम अधिकारी**

**प्रा ऋषिकेश तहकिक**


**प्राचार्य**

**डॉ एन आर चव्हाण**

**महात्मा गांधी मिशन**


**कृषी जैव तंत्रज्ञान महाविद्यालय गांधेली औरंगाबाद**

**वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ संलग्न**



''गाव हा विश्वाचा नकाशा । गावावरून देशाची परीक्षा । गाव भंगता येईल अवदशा । देशामाजी ।।'

(राष्ट्रसंत तुकडोजी महाराज)



# लक्ष्य गीत

उठें समाज के लिए उठें- उठें
जगे स्वराष्ट्र के लिए जगें-जगें
स्वयं सजे वसुंधरा संवार दें -२

हम उठें उठेगा जग हमारे संग साथियों
हम बढ़ें तो सब बढ़ेंगे अपने आप साथियो
जमीं पे आसमान को उतार दें -२
स्वयं सजे वसुंधरा संवार दें-२

उदासियों को दूर कर ख़ुशी को बाँटते चले
गाँव और शहर की दूरियों को पाटते चलें
ज्ञान को प्रचार दें प्रसार दें
विज्ञानं को प्रचार डी इ प्रसार दे
स्वयं सजे वसुंधरा संवार दें-२

समर्थ बाल वृद्ध और नारियां रहे सदा
हरे भरे वनों की शाल ओढ़ती रहे धरा
तरक्कियो की एक नई कतार दें-२
स्वयं सजे वसुंधरा संवार दें-२

ये जाति धर्म बोलियाँ बने न शूल राह की
बढाए बेल प्रेम की अखंडता की चाह की
भावना से ये चमन निखार दें
सद्धभावना से ये चमन निखार दें
स्वयं सजे वसुंधरा संवाद दें -२

उठें समाज के लिए उठें- उठें
जगे स्वराष्ट्र के लिए जगें-जगें
स्वयं सजे वसुंधरा संवार दें -२

# अनुक्रमणिका


| अनु क्र. | विवरण | पृष्ठ. क्र. |
|---|---|---|
| १ | **प्रस्तावना** | ०५ |
| २ | **महाविद्यालयीन सल्लागार समिती** | ०६ |
| ३ | **राष्ट्रीय सेवा योजना - वार्षिक अहवाल** | ०८-२३ |
| ४ | **विशेष शिबिराची माहिती** | २४ |
| ५ | **शिबिरातील उपस्थित स्वयंसेवकांची यादी** | २६-२७ |
| ६ | **विशेष शिबीर अहवाल २०२२-२३** | २८-३५ |
| ७ | **वृत्तपत्रांनी घेतलेली दखल** | ३६ |

# प्रस्तावना

महाविद्यालयीन अभ्यासक्रमाला राष्ट्रसेवेची जोड देऊन राष्ट्रोद्धार कसा साधता येईल, या दृष्टीने १९५० ते १९६९ पर्यंत तत्कालीन विश्वविद्यालय आयोगाचे अध्यक्ष डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू, केंद्रीय मंत्री डॉ. सी. डी. देशमुख, प्रो. के. जी. सैयद्दीन, शिक्षण समितीचे अध्यक्ष डॉ. दौलतासिंग कोठारी, शिक्षणमंत्री डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव, भारतातील विद्यापीठांचे कुलगुरू, विद्यार्थी प्रतिनिधी यांच्यात विचार विनिमय झाला. राष्ट्रीय सेवा ही राष्ट्रीय एकात्मतेसाठी एक 'सशक्त साधन' सिद्ध होऊ शकते, शहरी विद्यार्थ्यांना ग्रामीण जीवन अवगत होईल. आणि महात्मा गांधी जन्म शताब्दी वर्षाचे औचित्य साधून दि. २४ सप्टेंबर १९६९ रोजी भारतातील सर्व राज्यांतून ३७ विद्यापीठांत पदवीपूर्व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय सेवा योजना सुरू करण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजनेचे सिद्धांत वाक्य आहे, 'मला नाही तुम्हाला'. नि:स्वार्थ सेवाभाव त्यामागे आहे. महात्मा गांधी मिशन संचलित एम जी एम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, एम जी एम हिल्स, गांधेली येथे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ दरम्यान राष्ट्रीय सेवा योजनेच्या मार्फत विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते यात औरंगाबाद शहरातील विविध सेवाभावी संस्था ., नागरिक, प्रशासन ,अधिकारी, तसेच शाळकरी मुलांचा चांगला प्रतिसाद मिळालायात प्रामुख्याने वृक्षारोपण ., उद्योजकता आणि कौशल विकास कार्यक्रम, शासनाच्या विविध योजना विषयक मार्गदर्शन, आरोग्य विषयक कार्यक्रम, प्रगतशेती, परिसर स्वछता अभियान, पर्यावरण संवर्धन, रक्तदान तसेच अवयवदान बदल जागरूकता, युवा दिन , व्यसनमुक्ती ,इत्यादी विषयावर प्रात्यक्षिक, बौद्धिक विचारमंथन, पथनाट्य, गटचर्चा इ मार्फत जनजागृती करून तसेच व्याख्यानाचे आयोजन या दिवसांत करण्यात आले आहेव्या स्वातंत्र्य दिनाच्या स्मरणार्थ झालेल्या नियमित बैद्धिक विचारमंथनातून ७६ . आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत महाविद्यालयात नियमित राष्ट्रगीताचे सामूहिक गायनाची सुरुवात देखील माहाविद्यालयात रा स यो च्या स्वयंसेवकडून तसेच विद्यार्थीकडून सुरुवात झाली .महाविद्यालयाचे विशेष शिबीर आडगाव येथे ९ जानेवारी २०२३ ते १५ जानेवारी २०२३ येथे घेण्यात आले या शिबिरात युवकांचा ध्यास ग्राम शहर विकास याच्या माध्यमातून गावात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले यामध्ये रक्तदान शिबीर,वृक्षारोपण,पर्यावरण संवर्धन,बालविवाह आणि स्वछता संदर्भात प्रबोधन अश्या विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वरील सर्व कार्यक्रमासाठी एमजीएम गांधेली हिल्स चे संचालक सुदाम पवार, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एन आर चव्हाण यांचे विशेष मार्गदर्शक लाभले यांनी विशेष मेहनत घेतली आर आर तहकिक .

# राष्ट्रीय सेवा योजना

## महाविद्यालयीन सल्लागार समिती

| अनु क्रं | नाव | विशिष्ट |
|---|---|---|
| १ | डॉ एन आर चव्हाण | प्राचार्य |
| २ | प्रा आर आर तहकिक | रा स यो कार्यक्रम अधिकारी - |
| ३ | प्रा व्ही एम शुक्रे | सदस्य - |
| ४ | श्री अशोक लोखंडे | उपसरपंच, दत्तक गाव ( आडगाव बु ) |
| ५ | डॉ सोनम काळे | सदस्य - |
| ६ | कुणाल कावरखे | विद्यार्थी प्रतिनिधी |
| ७ | अमृता कदम | विद्यार्थी प्रतिनिधी |

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
महात्मा गांधी मिशन
कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय
औरंगाबाद

# भाग एक - वार्षिक अहवाल

## भाग एक - वार्षिक अहवाल

# राष्ट्रीय सेवा योजना - वार्षिक अहवाल

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ दरम्यान राष्ट्रीय सेवा योजनेच्या सल्लागार समितीच्या बैठक दिनांक १५ जुलै २०२२ नंतर प्राचार्य डॉ एन आर चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली  कार्यक्रम अधिकारी प्रा आर आर तहकिक यांनी खालील ठराव सदस्य चर्चा आणि विचारविनिमय नंतर मंजूर करण्यात आले होते.

१. २०२२- २३ या शैक्षणिक वर्षातील स्वयंसेवकांची निवड समितीची स्थापना
२. रा स यो दिनदर्शिका आणि उपक्रम  मंजूर करून घेणे
३. वर्षातील विविध उपक्रमाबाबत चर्चा

## उपक्रम

### जुन २०२२

**आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन**





एमजीएम कृषी जैवतंत्रज्ञान  गांधेली येथे योग दिनाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी एम जी एम हिल्सचे अधिष्ठाता सुदाम पवार यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता प्रसंगी कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ नरेंद्रसिंग चव्हाण याची उपस्थिती होती. नानासाहेब कदम महाविद्यालयाचे प्रा. डॉ. अनिल पांडे यांन मनःशांती, आरोग्य आणि आनंदासाठी योग या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले, यावेळी गांधेली प्रक्षेत्रावरील तिन्ही महाविद्यालयाच्या वकृषी विज्ञान केंद्राच्या सर्व विद्यार्थी तसेच शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसमोर योग प्रात्यक्षिकांचे सादरीकरण केले.

### जुलै २०२२

## प्लेटलेट्स(च्ॡघ) दान आणि फार्मा उद्योजकता जागरूकता अभियान जागरूकता :




रक्तदान आणि प्लेटलेट्स दानानिमित्त समाजात असलेले गैरसमज दूर करून त्याबद्दल जागरूकता निर्माण करण्याच्या हेतूने महाविद्यालयात २३ जून २०२२ रोजी दुपारी १ ते तीन दरम्यान श्री विश्वजित काशीद आणि डॉ ऋषिकेश पोळ यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी विश्वजित काशीद यांनी रक्तातील विविध घटकांबद्दल माहिती देत प्लेटलेट्स दानाचे महत्व पटवून सांगितले

## उद्योजकता आणि कौशल्य विकास कार्यक्रम – सारथी




विद्यार्थीसाठी उद्योजकता विकास कार्यक्रमा अंतर्गत व्यक्तिमत्व विकास, सिध्दीप्रेरणा प्रशिक्षण, उद्योगसंधी निवड व शोध, उद्योगाशी निगडीत शासकीय व निमशासकीय योजनांची माहिती, बँकेच्या कर्जयोजना, बाजारपेठ सर्वेक्षण, प्रकल्प अहवाल, व्यवस्थापन कौशल्य इत्यादीविषयक महाविद्यालयातील विद्यार्थांना करण्यात आले यावेळी सार्थीमार्फत विकिराजे पाटील तर अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ मार्फत प्रवीण आगवणे पाटील यांनी मार्गदर्शन केले.

## वृक्षारोपण-बनमहोत्सव – २०२२




१ ते ७ जुलै रोजी जागतिक वन महोत्सव सप्ताहाचे औचित्य साधून महात्मा गांधी मिशन कृषी जैवतंत्रज्ञान,कृषीअन्न-तंत्रज्ञान, व नानासाहेब कदम कृषी महाविद्यालय यांच्या वतीने एम जी एम गांधेली परिसरात वृक्ष लागवड करण्यात अली .यासाठी विविध प्रजातींची देशी रोपांची लागवड करण्यात आली .या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून वनविभाग परिमंडळ-१ चे अधिकारी श्री गुजर , औरंगाबाद वनविभागाचे श्री .मनकवर, हे अधिकारी उपस्थित होते.

## जागतिक अवयवदान दिवस




विश्व अवयवदान दिवस निमित्ताने शहरात ठिकठिकाणी .अवयव दान आणि रक्तदान बद्दल जागरूकता निर्माण व्हावी यासाठी पथनाट्य आणि भित्तिपत्रकाचे सादरीकरण झाले.याव्यातिरिक्त सोशल मीडिया, फेसबुक, ट्विटर,युट्युब व्हिडियोजच्या माध्यमातून रक्तदाना बद्दल शास्त्रीय माहिती देण्याचे व गैरसमज दूर करण्याचे प्रयत्न या द्वारे करण्यात आले .

## ऑगस्ट २०२२

### जागतिक युवा दिन





१२ ऑगस्ट रोजी आंतरराष्ट्रीय युवा दिन  साजरा केला जातो. युवा दिन हा जागतिक स्तरावर तरुणांचा आवाज, कृती आणि अर्थपूर्ण उपक्रम ओळखण्याची संधी आहे. या दिनाचे औचित्य साधत यावर्षी युनेस्कोने जाहीर केलेल्या यावर्षीची संकल्पना "इंटरगेनेरेशन  सोल्जेरिटी " च्या अनुसार कार्यक्रमाचे आयोजन केले यादरम्यान महाविद्यालयातील विविध वयोगटातील तरुण जसे प्राध्यापक, शिक्षक,  महाविद्यालयीन कर्मचारी यांचे गट स्थापन करण्यात आले. या गटामार्फत परिसरात स्वछता करण्यात आली तसेच क्रिकेट स्पर्धांचे देखील आयोजन यावेळी करण्यात आले.  कार्यक्रमादरम्यान युवादिनाचा उत्साह पाहण्यास मिळाला. कार्यक्रमाची सांगता एकतेची आणि व्यसनापासून दूर राहण्याची व राष्ट्रीय कामात योगदान देण्याची शपथ देण्यात आली.

### आझादी का अमृत महोत्सव







७५ व्या  स्वातंत्र्य दिनाच्या अमृत महोत्सवऔचित्य साधत  शासन व महराष्ट्र शासन यांच्या सूचनेनुसार  एम.जी.एम कृषी जैव तंत्रज्ञान  महाविद्यालय, 'राष्ट्रीय सेवा योजना' च्या माध्यमातून  ११ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट या कालावधी मध्ये **"हर घर झेंडा "** हा उपक्रम वेगवेगळ्या कार्यक्रमांच्या मध्यामात्तून राबवण्यात आला. महाविद्यालयातील सर्व राष्ट्रीय

सेवा योजनेतील स्वयंसेवकांनी व विद्यार्थ्यांनी हर घर तिरंगा या मोहिमे मध्ये उत्स्फूर्तपने सहभागी होऊन प्रत्येक व स्वयंसेवकांनी दहा घरावर तिरंगा फडकवला.

## स्वतंत्रता महोत्त्सव





७५ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त महाविद्यालयात ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी गांधेली हिल्सचे संचालक सुदाम पवार आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ नरेंद्रसिंग चव्हाण यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक आणि महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सामूहिक राष्ट्रगीत म्हणत राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली.

## गाजर गावात निर्मूलन आठवडा





एम.जी.एम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, येथे १८ आणि १९ ऑगस्ट रोजी १७ वा गाजर गवत निर्मूलन सप्ताह साजरा करण्यात आला, यावेळी परिसरातील गाजर गवताचे निर्मुलन करण्यात आले तसेच प्रभातफेरी काढून नैसर्गिक पद्धतीने निर्मुलन पद्धतीचे अवाहन केले, रासायनिक पद्धतीचे धोके समजवण्यात आले.

**स्वछता पंधरवाडा**





महात्मा गांधी मिशन कृषी महाविद्यालयाने दिनांक १६ ते ३१ ऑगस्ट या कालावधीत वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम समनव्ययक अधिकारी यांनी निर्धारित केलेल्या कालावधीत स्वछता पंधरवडा साजरा करण्यात आला. स्वछता पंधरवड्याचा शुभारंभ दिनांक १६ ऑगस्ट रोजी , एम. जी एम हिल्स चे संचालक श्री. सुदाम पवार यांच्या मार्गदर्शनाखाली एम.जी.एम हिल्स,गांधीली प्रक्षेत्रात वृक्ष लागवडीने करण्यात आला होता.

सप्टेंबर- २०२२

## शिक्षक दिन साजरा





एमजीएम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, गांधेली येथे शिक्षण दिनानिमित्त कार्यक्रर्य माचे आयोजन करण्यात आले होते. ते या कार्यक्रर्य माच्या अध्यक्षस्थानी एमजीएमचे संचालक शिक्षण (कृषी) तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन आर चव्हाण हे होते. ते यानिमित्ताने विद्यार्थ्यांनी शिक्षकांसाठी मनोरंजक खेळांचे आयोजनही केले होते. महाविदयालयातील विद्यार्थांनी अध्यापनाचे कार्य केले, हा कार्यक्रम राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यामातून साजरा झाला.

## रा स यो इम्पानेल्लेड ट्रेनींग ) अहमदनगर येथे सात दिवसीय प्रशिक्षण






राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा ऋषिकेश तहकिक यांना अहमदनगर महाविद्यालय, अहमदनगर येथील इम्पानेल्लेड प्रशिक्षण साठी दिनांक १० सप्टेंबर ते १६ सप्टेंबर दरम्यान पाठवण्यात आले. या सात दिवसीय शिबिरादरम्यान प्रशिक्षणार्थींना रा स यो योजनेच्या प्रभावी अमलबजावणीसाठी आणि कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या नेतृत्व क्षमतेचा विकास साधण्यासाठी प्रशिक्षण दिले गेले. यामध्ये महाराष्ट्रातील ४८ विद्यापीठांतून ५० कार्यक्रम अधिकारी

आले होते. यामध्ये डॉ कार्तिकेयन, क्षेत्रीय संचालक, डॉ शरद बोरुडे ( संचालक इ टी आई ) डॉ अनिल खडे ( कार्यक्रम सम्वयक ) शीतल परदेशी आणि इतर मान्यवरांचे मार्गदर्शन लाभले.

## राष्ट्रीय सेवा दिनाच्या निमित्ताने २१ व्या शतकात राष्ट्राच्या जडणघडणीत युवकांचे योगदान आणि आव्हाने या विषयावर परिसंवाद




२१ सेप्टेंबर २०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना दिवसाचे निमित्त महाविद्यालयात राष्ट्राच्या जडण घडणीत युवकांचे योगदान, या विषयावर परिसंवादाचे आयोजन महाविद्यालयीन स्थरावर करण्यात आले होते यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री सुदाम पवार, संचालक एम जि एम हिल्स आणि प्रमुख पाहुणे प्रसाद कणंगले हे होते आपल्या भाषणात श्री कंगले यांनी शिक्षण सर्वच पातळ्यांवर, विविध स्तरावर, विविध क्षेत्रातून बदलत चालले आहे. काळाप्रमाणे जसा समाजात जागतिकीकरणाच्या रेट्यात आपल्याला टिकून राहायचे असेल तर आपल्याला शिक्षणाची एकविसाव्या शतकातील उद्दिष्टे ठरवावी लागतील.असे आवाहन केले या कार्यक्रमाला एकूण ५० स्वयंसेवक उपस्थित होते.

## राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांची ओळख परेड आणि ओरिएंटेशन कार्यक्रम




राष्ट्रीय सेवा योजना नव्याने नोंदणी झालेल्या विद्यार्थीसाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माहितीसाठी तसेच विद्यार्थीमध्ये संवाद कौशल्य, भाषण कौशल्य याच्या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांना दत्तक गावात विविध प्रकारचे सर्वेक्षण करण्याबद्दल मार्गदर्शन करण्यासाठी महाविद्यालय स्थरावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये स्वयंसेवकांनी नवीन नवीन योजनांची माहिती घ्यावी, त्यासाठी संवाद साधावा लागतो, या सरावामुळे ते संवादकौशल्य अवगत करू शकतात, यासाठी कम्युनिटी खेळ घेत कार्यशाळा घेतली, तसेच वाचनाच्या सवयीमुळे भाषेवर प्रभुत्व मिळवता येते. वक्तृत्व हा एक व्यक्तिमत्त्वाचा प्रभावी पैलू आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या

कार्यक्रमात विद्यार्थ्यांना सभा संचालन, प्रास्ताविक भाषण, मनोगत, आभार प्रदर्शन करावयाचे असते. यामुळे त्याच्या ठिकाणी सभाधीटपणा येतो. सरावाचे सातत्य टिकू न ठेवल्यास त्यांची वक्तृत्व कला विकसित होते. मैदानी वक्तृत्वाचा लाभ होतो. भाषाप्रभुत्वामुळे मोठमोठ्या सभा जिंकण्यास ते समर्थ ठरतात.

## दत्तक गाव भिंदोन येथे जनावरांवरील लंम्पि स्किन आजाराबाबत जनजागृती आणि लसीकरण मोहीम






सप्टेंबर २०२२ महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात राज्यात लम्पी स्कीन आजाराचा प्रादुर्भाव वाढत होता ,आणि त्यामुळे परिसरात घबराटीचे वातावरण होते,राजस्थान आणि गुरजारमध्ये या आजारान थैमान घातलं असल्याने याची तीव्रता दुग्ध उत्पादनावर होताना दिसत होती, यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून प्राचार्य नरेंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पशुसंवर्धन विभागाच्या साथीने कार्यक्रम अधिकारी प्रा ऋषिकेश तहकिक, आणि रासेयो च्या २५ स्वयंसेवकांनी प्रत्यक्ष शेतकऱ्याच्या गोठ्यावर जाऊन भित्तीपत्रके, पथनाट्य माध्यमातून जनजागृती केली जात आहे. सिंदोन, औरंगाबाद येथे हा उपक्रम राबवला गेला

## जागतिक पर्यटन दिन साजरा






२७ सप्टेंबर रोजी मार्फत राष्ट्रीय पर्यटन दिवस भारतात पर्यटनाचे महत्त्व आणि भारतीय अर्थव्यवस्थेत त्याची भूमिका याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी साजरा करन्यात आला, यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ माधुरी सावंत, संचालक ( बामू औरंगाबाद ) डॉ दीपक हर्णे ( प्रादेशिक सचिव पर्यटन विभाग) श्रीमंत हरकिरे ( उपसंचालक पर्यटन

विभाग ) यांची उपस्थिती होती हा कार्यक्रम एम जि एम हिल्स गांधेली आणि कृषी विज्ञान केंद्र यांच्या विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. राष्ट्रीय स्वयंसेवक योजनेच्या माध्यमातून कार्यक्रमाची अमलबजावणी केली

## ऑक्टोबर- २०२२

### महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री जयंती साजरी









राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची १५२ वी जयंती महात्मा गांधी मिशनच्या संकुलात साजरी करण्यात आली. त्यानिमित्त महाविद्यालय स्तरावर विविध कार्यक्रम घेणयात आले, २ ऑक्टोबर रोजी सकाळी परिसर स्वछता करण्यात अली तसेच एम जी एम कृषी संकुलाचे संचालक सुदाम पवार यांच्या हस्ते स्वछता पंधरवड्याची घोषणा करण्यात आली. दुपारच्या सत्रात प्रार्थना सभा आयोजित करण्यात आली होती. हा दिवस आंतरराष्ट्रीय अहिंसा दिवस म्हणूनही पाळला जातो. तसेच माजी प्रधानमंत्री लालबहादूर शास्त्री यांची ११७ वी जयंतीही आज देशभर साजरी होत आहे. दोन्ही महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून तसेच व्याखायनाचे आयोजन करून त्याच्या कार्याचे समरण करण्यात आले.

### महात्मा गांधी जंयतीनिमित्त स्वच्छता पंधरवडा साजरा







विदयार्थी कल्याण अधिकारी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी यांच्या निर्देशांकानुसार महात्मा गांधी जंयती निमित्ताने महात्मा गांधी मिशन कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयात स्वच्छता पंधरवाडा नियोजित कार्यक्रमानुसार दिनांक २ ऑक्टबर ते १६ ऑक्टबर साजरा करण्यात आला. एम जी एम कृषी जैवतंत्रद्यान महाविद्यालयाच्या रा स यो एककाने स्वच्छता मोहिमेचे आयोजन केले होते. स्वछता पंधरवड्याचा शुभारंभ दिनांक ३ ऑक्टबर रोजी रोजी एम जी एम चे सचिव श्री. अंकुशराव कदम, एम. जी एम हिल्स चे संचालक श्री. सुदाम पवार

प्राचार्य डॉ. एन आर चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली रा स यो अधिकारी प्रा आर आर तहकिक यांनी वृक्ष लागवडीने करण्यात आला,यावेळी प्रा आर आर तहकिक यांनी विद्यार्थांना स्वछतेची शपथ दिली, विद्यार्थानी परिसराचे सर्वेक्षण केले त्यानुसार सहा गट करून अभियान राबवले या अभियानात रा स यो च्या ४५ स्वयंसेवकांनी तर १५ महाविद्यालयीन विद्यार्थांनी सहभाग नोंदवला, दिनांक ४,आणि ५ रोजी कार्यालयातील दस्तऐवज,स्टोअरची स्वछता मोडके फर्निचर इ. व्यवस्तिथ करून स्वछ करण्यात आली, त्यानंतर ६ ते ८ तारखेला तसेच महाविद्यालयाच्या इमारत व आजूबाजूच्या परिसराची स्वच्छता करण्यात आली, आणि विद्यार्थ्यांना कचऱ्यावर प्रक्रिया करण्याची माहिती देत कंपोस्ट खताच्या निर्मितीचे प्रात्यक्षिक दिले, दिनांक १० ते १५ या कालावधीत महाविद्यालयाच्या प्रक्षेत्रातील दत्तक घेतलेल्या गावात समविष्ट असलेल्या भिंदोन आणि पळसवाडी येथे गावातील सार्वजनिक मंदिर, मंदिर परिसर प्राथमिक शाळा, सांडपाणी नाल्या तसेच लंम्पि रोगाची खबरदारी आणि पशुच्या गोठ्याची स्वछता करण्याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.

**महात्मा गांधी मिशन संचलित कृषी शिक्षण संकुलांमार्फत साई टेकडी येथे मेगा क्लीनलिनेन्स ड्राईव्ह मोहीमेअंतर्गत प्लास्टिक निर्मूलन आणि जनजागृती**






महात्मा गांधी मिशन कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद एम जी एम अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय आणि नानासाहेब कदम कृषी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता अभियान अंतर्गत १८ ऑक्टोबर २०२२रोजी शहरात प्लास्टिक निर्मूलन जनजागृती रॅली काढण्यात आली .१८ ऑक्टोबर रोजी, महात्मा गांधी मिशन हिल्स ते साई टेकडी परिसरात रॅली काढण्यात आली, यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या एकुण ७२ स्वयंसेवकांनी या रॅलीमध्ये

सहभागी होऊन नागरिकांना प्लास्टिक न वापरण्याबाबत जनजागृती केली. साई मंदिर परिसरातील हॉटेल्स, फळविक्रेते, आदी ठिकाणी जाऊन स्वयं सेवकांनी एकूण सात गट स्थापन करून प्रा ऋषीकेश तहकिक, प्रा गणेश राऊत आणि प्रा चेतन डोळस याच्या मार्गदर्शनाखाली प्लास्टिक गोळा करून त्यांची एकात्मिक पद्धतीने निर्मूलन केले.

## नोव्हेंबर - २०२२

### महात्मा गांधी मिशन कृषी जैव तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या दोन स्वयंसेवकांची राष्ट्रीय पातळीवरील साहसी निवासी शिबिरासाठी निवड







राष्ट्रीय सेवा योजनेच्या क्षेत्रीय कार्यालला मार्फत चिखलदरा अमरावती येथे होणाऱ्या "साहसी क्रीडा शिबिरात महात्मा गांधी मिशन कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद आणि नानासाहेब कदम कृषी महाविद्यालय यांच्या रा स यो स्वयं सेवकांची निवड करण्यात आली आहे. दिनांक ०२ **ते** ०५ **नोव्हेंबर** २०२२ दरम्यान चिखलदरा अमरावती येथे एम जी एम कृषी जैव तंत्रज्ञान महाविद्यालयाचे **कु. रुद्रयानी मुंजे**, **आणि कु. कुणाल कावरके** आणि यांची निवड परभणी येथे डॉ. सचिन मोरे, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी यांनी केली

## संविधान दिनानिमित्त प्रशमंजुषा स्पर्धा आणि संविधान जागृती दिनाचे आयोजन






राष्ट्रीय सेवा योजना एकक, एमजीएम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद येथे संविधान दिनानिमित्त संविधान पत्रिका उद्देशिकेचे समूह वाचन करण्यात आले. प्रश्नमंजुषा आयोजित करण्यात आली. तसेच २६/११ च्या हल्ल्यात वीरगती प्राप्त झालेल्या शहिदांना आदरांजली अर्पण करण्यात आली.

## डिसेंबर - २०२२

## 'आव्हान" राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांची निवड






राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव याठिकाणी दिनाक १९ ते २८ डिसेंबर २०२२ दरम्यान आयोजित करण्यात येत असलेल्या राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरासाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी संलग्नित असलेल्या एमजीएम अन्नतंत्रज्ञान महाविद्यालय, कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय आणि नानासाहेब कदम कृषी महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवकांची निवड करण्यात आलेली आहे. आकस्मिक नैसर्गिक आपत्ती आणि आपत्तींच्या प्रसंगी जलद बचाव आणि मदत सेवा पुरवण्यासाठी,

नागरी प्रशासनाशी सहकार्य करण्यासाठी आणि मदतीचा हात देण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना (ऩ्च्च) मधून प्रशिक्षित तरुण स्वयंसेवकांचा समूह तयार करणे हे आव्हान चे उद्दिष्ट आहे. राष्ट्रीय आपत्ती बचाव दलाच्या (ऩ्क़्डक़्) व्यावसायिक प्रशिक्षकांमार्फत या शिबिरामध्ये निवड झालेल्या रासेयो स्वयंसेवकांना आवश्यक परिपूर्ण प्रशिक्षण देण्यात येते.

## रक्तदान शिबीर

महात्मा गांधी मिशनच्या ३६ व्या वर्धापन दिनानिमित्त दि. २० डिसेंबर रोजी एमजीएम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, गांधेली व एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यांच्या सयुंक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन प्रसंगी एमजीएमचे संचालक शिक्षण (कृषी) तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन.आर.चव्हाण यांनी विद्यार्थ्यांच्या या स्तुत्य कार्यक्रमाबद्दल कौतुक केले व जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी रक्तदान करून रुग्णांचे प्राण वाचविण्याचे आवाहन केले. याप्रसंगी एमजीएम रक्त पेढीचे डॉ. ग्रीष्मा एन. जॉर्ज व डॉ. आशुतोष देव, तसेच एमजीएम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी एमजीएम कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ, महाविद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी अशा एकूण ५० रक्तदात्यांनी रक्तदान केले.

## जानेवारी २०२३

## विशेष श्रमसंस्कार शिबीर

महात्मा गांधी मिशन संचलित एम जी एम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, एम जी एम हिल्स, गांधेली यांच्या वतीने आडगाव ब्रु येथे दिनांक ९ जानेवारी ते १३ जानेवारी दरम्यान राष्ट्रीय सेवा योजनेच्या मार्फत विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले






## राष्ट्रीय युवक दिवस







स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ जयंती कार्यक्रम प्रसंगी प्रा ऋषीकेश तहकिक बोलत होते. या प्रसंगी व्यासपीठावर जिल्हा परीषद प्राथमिक शाळा आडगाव येथील मुख्याध्यापिका सौ. खरात, सरपंच गोरख निकम, उपसरपंच अशोक लोखंडे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा गणेश राऊत,आदी मान्यवर, जिल्हा परीषद प्राथमिक शाळेचे विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ, अणि राष्ट्रीय सेवा योजनेचे ५० स्वयंसेवक उपस्थित होते. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा गणेश राऊत यांनी स्वामी विवेकानंद यांच्या आयष्यातील प्रसंग विषद करताना कार्यक्षमता आणि प्रभावीपना याचे महत्व सांगत प्रेरणा, चैतन्य आणि उत्साहपूर्ण जीवनाचा अवलंब करून यशाकडे वाटचाल करावी असे प्रतिपादन केले.

## राष्ट्रीय मतदार दिवस





१३ जानेवारी २०२३ राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा गणेश राऊत यांनी रासयो विशेष शिबिर आयोजित मतदार जागृती अभियाना अतर्गत ग्रामस्थांसमोर केले. आडगाव येथे एम जी एम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय व अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विशेष श्रम संस्कार शिबीरात मतदार कुटुंबाचे व गावाचे मतदान शंभर टक्के होईल यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. यावेळी राष्ट्रिय सेवा योजनेच्या स्वयसेवकानी गावातील मुख्य चौकात पथ नाट्य सादर केले यात मतदानाची टक्केवारी वाढल्यास सक्षम उमेदवारांना नेतृत्व करण्याची संधी मिळेल, यामुळे

सर्वंकष विकास साधला जाईल. बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण होत आहे. मात्र महिलांनी देखील लोकशाहीचे समक्षमीकरणासाठी पुढे येण्याची गरज असल्याचा संदेश देण्यात आला.

## प्रजासत्ताक दिवस

दिनांक २६ जानेवारी २०२३ रोजी महात्मा गांधी मिशनच्या गांधेली परिसरातील कृषी जैवतंत्रज्ञान, अन्नतंत्रज्ञान, नानासाहेब कदम कृषी महाविद्यालय व कृषी विज्ञान केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने नानासाहेब कदम कृषी महाविद्यालयाच्या प्रांगणात शहिद लष्करी अधिकाऱ्याच्या वीरपत्नीच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले या प्रसंगी एमजीएम कृषी शिक्षण संकुला एम जी एम हिल्सचे सीईओ डॉ प्रवीण सूर्यवंशी, संचालक श्री सुदाम पवार, कृषी जैव तंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. आर.चव्हाण,नानासाहेब कदम कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन एम मस्के,अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोनल झंवर,व कृषी विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक श्री काकासाहेब सुकाशे हे उपस्थित होते. या वेळी तिन्ही महाविद्यालयाच्या विद्यार्थांनी पथसंचलन करून ध्वजवंदना दिली या कार्यक्रमासाठी सर्व महाविद्यालयाचे विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

# भाग २ –
# विशेष श्रमसंस्कार शिबीर २०२२-२३

## भाग २ - विशेष श्रमसंस्कार शिबीर २०२२-२३

# प्रस्थावना- विशेष शिबीर २०२२-२३

महात्मा गांधी मिशन संचलित एम जी एम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, एम जी एम हिल्स, गांधेली यांच्या वतीने आडगाव ब्रु येथे दिनांक ९ जानेवारी ते १३ जानेवारी दरम्यान राष्ट्रीय सेवा योजनेच्या मार्फत विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत कार्यक्रमाचे उद्घाटन दिनांक ९ जानेवारी रोजी सकाळी ११: वाजता आडगाव येथे करण्यात आले यात गावातील कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणुन सुदाम पवार, संचालक, एम जी एम हिल्स यांची उपस्थिती होती तर प्रसंगी एम जी एम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ नरेंद्र चव्हाण, एम जी एम अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय प्राचार्या डॉ सोनल झंवर, एम जी एम नाना साहेब कदम कृषी महाविद्यालय प्राचार्य डॉ निलेश मस्के, गोरख निकम, सरपंच अशोक लोखंडे, उपसरपंच श्री. चौधरी, ग्राम विकास अधिकारी सर्व ग्रामपंचायत सदस्य ,विविध कार्यकारी सोसायटी आदी उपस्थित होते आडगाव ब्रु. औरंगाबादपासून १३ किमी अंतरावर आहे. या विशेष शिबिरात पन्नास एनएसएस स्वयंसेवक सहभागी झाले होते. या सात दिवसीय शिबिरात विविध सेवाभावी संस्था , नागरिक, प्रशासन ,अधिकारी, तसेच शाळकरी मुलांचा सहभागाने विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत यात प्रामुख्याने वृक्षारोपण, उद्योजकता आणि कौशल विकास कार्यक्रम, शासनाच्या विविध योजना विषयक मार्गदर्शन, आरोग्य विषयक कार्यक्रम, प्रगतशेती, परिसर स्वछता अभियान, पर्यावरण संवर्धन, रक्तदान तसेच अवयवदान बदल जागरूकता, कृषी प्रदर्शन युवा दिन , व्यसनमुक्ती ,इत्यादी विषयावर प्रात्यक्षिक, बौद्धिक विचारमंथन, पथनाट्य, गटचर्चा इ मार्फत जनजागृती करून तसेच व्याख्यानाचे आयोजन या दिवसांत करण्यात आले होते.

| | | |
|---|---|---|
| १ | शिबीर दिनांक | ९ ते १५ जानेवारी |
| २ | महाविद्यालयचे नाव | एम जी एम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय |
| ३ | कार्यक्रम अधिकारी | प्रा आर आर तहकिक |
| ४ | शिबीर स्थळ | आडगाव बु ता जि औरंगाबाद |
| ५ | स्वयंसेवकांची संख्या | २५ |

# शिबिरातील उपस्थित स्वयंसेवकांची यादी

| | अनुक्रमांक | स्वयंसेवकांचे नाव | अनुजाती | | अनु जमाती | | इमाव आणि अनारक्षित | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०२०BTGD | पंकज पाबळे | | | | | M | |
| २ | २०२०BTGD | नवनाथ शिरसाठ | | | | | M | |
| ३ | २०२०BTGD | महाकाल निकिता सुखदेव | | | | | | F |
| ४ | २०२०BTGD | भास्कर चव्हान | | | | | M | |
| ५ | २०२०BTGD | गिरी आकाश बालगीर | | | | | M | |
| ६ | २०२०BTGD | गुरनुले जीवन जोगाजी | | | | | M | |
| ७ | २०२०BTGD | काटकर हर्षल विजय | | | | | M | |
| ८ | २०२०BTGD | कावरखे कुणाल गजानन | | | | | M | |
| ९ | २०२०BTGD | मोरे हर्षवर्धन रमेश | | | | | M | |
| १० | २०२०BTGD | पटेल ओ एम | | | | | M | |
| ११ | २०२०BTGD | काळे शंकर संजय | | | | | M | |
| १२ | २०२०BTGD | पवार बळीराम निवृत्ती | | | | | M | |
| १३ | २०२०BTGD | रोहित तौर | | | | | M | |
| १४ | २०२०BTGD | अभिजीत गावडे | | | | | M | |
| १५ | २०२०BTGD | पृथ्वीराज राठोड | | | | | M | |
| १६ | २०२०BTGD | ओमकार काटे | | | | | M | |
| १७ | २०२०BTGD | प्रगती अनिल बिरारे | | F | | | | |
| १८ | २०२०BTGD | जाधव रुतुजा सयाजी | | | | | | F |
| १९ | २०२०BTGD | कदम अमृता आनंदा | | | | | | F |
| २० | २०२०BTGD | काजलकर सानिका संजय | | | | | | F |
| २१ | २०२०BTGD | कराडे रुतुजा शेषराव | | | | | | F |
| २२ | २०२०BTGD | मुंजे रुद्रायणी पराग | | | | | | F |
| २३ | २०२०BTGD | ऐश्वर्या थिटे | | | | | | F |
| २४ | २०२०BTGD | पवार शितल रामनारायण | | | | | | F |
| २५ | २०२०BTGD | गणेश निबाळकर | | | | | | |

# गोषवारा

| | | |
|---|---|---|
| महाविद्यालयाचे नाव | : | एम जी एम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय |
| एकूण क्र. नोंदणीकृत विद्यार्थ्यांची संख्या :<br><br>महिलांची संख्या | :<br><br>: | २५<br><br>०८ |
| पुरुष संख्या | : | १७ |
| अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची संख्या | : | पुरुष : ०० |
| | | महिलां: ०१ |
| अनुसूचित जमाती विद्यार्थ्यांची संख्या | : | पुरुष : ०० |
| | | महिलां: ०० |

**महात्मा गांधी मिशन संचलित कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, गांधेली (औरंगाबाद) च्या सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षा मध्ये राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत आयोजित केलेल्या विशेष निवासी शिबिराची माहिती पुढील प्रमाणे**

## शिबिराचे उदघाटन



**दिनांक ९/०१/२०२३**

औरंगाबाद जिल्ह्यातील आडगाव येथे एम जी एम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय व एमजीएम अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, गाधेली, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या सात दिवसीय रा स यो श्रम संस्कार शिबीराचे उद्घाटन सकाळी ११:३० वाजता आयोजीत करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे आयोजन रा स यो एकक विद्यार्थी केले होते तर कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणुन सुदाम पवार, संचालक, एम जी एम हिल्स यांची उपस्थिती होती तर प्रसंगी एम जी एम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ नरेंद्र चव्हाण, एम जी एम अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय प्राचार्या डॉ सोनल झंवर, एम जी एम नाना साहेब कदम कृषी महाविद्यालय प्राचार्य डॉ निलेश मस्के, गोरख निकम, सरपंच अशोक लोखंडे, उपसरपंच श्री. चौधरी, ग्राम विकास अधिकारी सर्व ग्रामपंचायत सदस्य ,विविध कार्यकारी सोसायटी आदी उपस्थित होते

## स्वच्छता अभियान





दुपारच्या सत्रात या शिबीर कालावधीत ग्राम स्वच्छता, रस्ते स्वच्छता, गाजर गवत निर्मुलन, वृक्षारोपन, शोषखड्डे इत्यादी कार्यक्रम आयोजित करण्यात आले, एकूण ५० झाडे लावण्यात आले.

## श्रमदान आणि ग्रामफेरी






**दिनांक १० /०१/२०२३**

शिबीराच्या दुसऱ्या दिवशी १२ वाजता न्याहारी करून स्वयंसेवकांनी शिबीर स्थळी प्रस्थान केले, त्यानंतर १ ते ३ यावेलेत शाळा परिसरात स्वछता करत वर्गखोल्याचे सुशोभीकरण केले. यांनतर गावात ३-५ फेरी काढून

व्यसन मुक्ती, बेटी बचाओ याबद्दल सामाजिक संदेश देण्यात आला, यानंतर गावातील मुख्य चौकात राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता केली, कार्यक्रमाला २५ स्वयंसेवक सहभागी होते.






## वृक्षसंवर्धन संकल्प - एकात्मिक वक्ष संवर्धन

११/०१/२०२३





सकाळच्या सत्रात ठीक ९;३० वाजता स्वयंसेवक राष्ट्रगीत आणि प्रार्थनेसाठी एकत्र येत राष्ट्रगीत आणि रा स यो गीताचे सामूहिक गायन करण्यात आले .प्रार्थनेच्या सत्रांनंतर स्वयंसेवक अल्पोहार व त्यानंतर लगेचच ठीक ११ वाजता एम जी एम कृषी जैवतंत्रज्ञान आणि अन्न तंत्रज्ञानमहाविद्यालयाच्या एकूण ५० स्वयंसेवकांनी शिबीर स्थळापासून २किलोमीटर अंतरावर असलेल्या भिल्लवस्तीजवळील सार्वजानिक वनीकरण अंतर्गत असलेल्या जंगलात लागवड केलेल्या ८०० वृक्षांच्या संवर्धनाचाकार्यक्रम हातात घेतला, परिसरात असलेल्या जंगलातील वृक्षांचे योग्य संवर्धन व्हावे तसेच भूजल पातळी वाढावी यासाठी वृक्ष लागवड करत व्यवस्थित, डोंगरातील वाहणारे पाणी हे लागवड केलेल्या झाडाना मिळावे तसेच भूजल पातळी वाढावी या उद्देशाने नाले खोदले .

## बालविवाह -व्यसनमुक्ती मोहीम






संध्याकाळी ३:३० वाजता आदिवासी वस्तीत पथनाट्याद्वारे समाजप्रबोधनाचे कार्यक्रम राबवत व्यसन मुक्ती आणि मतदान जागृती करण्यात आली, सांयकाळी ५ वाजता राष्ट्रगीत आणि सायंप्रार्थना आणि प्रबोधन संदेशाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली .

## राष्ट्रीय युवक दिन व वाचन प्रेरणा अभियान







१२/०१/२०२३

युवकांनी स्वामी विवेकानंद यांचे विचार आणि आदर्श घेऊन स्वविकासाबरोबर राष्ट्राच्या विकासासाठी कार्य करावे तसेच त्यांच्या साहित्याचे सर्वांनी वाचन करावे असे आवाहन एमजीएम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय औरंगाबाद येथील प्रा. ऋषीकेश तहकिक यांनी केले. या प्रसंगी व्यासपीठावर जिल्हा परीषद प्राथमिक शाळा आडगाव येथील मुख्याध्यापिका सौ. खरात, सरपंच गोरख निकम, उपसरपंच अशोक लोखंडे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा गणेश राऊत,आदी मान्यवर, जिल्हा परीषद प्राथमिक शाळेचे विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ, अणि राष्ट्रीय सेवा योजनेचे ५० स्वयंसेवक उपस्थित होते. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा गणेश राऊत यांनी स्वामी विवेकानंद यांच्या आयष्यातील प्रसंग विषद करताना कार्यक्षमता आणि प्रभावीपना याचे महत्व सांगत प्रेरणा, चैतन्य आणि उत्साहपूर्ण जीवनाचा अवलंब करून यशाकडे वाटचाल करावी असे प्रतिपादन केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने या कार्यक्रमाअंतर्गत वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा ऋषीकेश तहकिक यांनी तर सूत्रसंचालन हर्षल काटकर आणि मोक्षदा गायकवाड व आभार प्रदर्शन रोहित तोर यांनी केले.

## नवमतदार जागृती अभियान

**१३/०१/२०२३**

### एम जी एम राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिरात: मतदार जनजागृती अभियान

१३/०१/२०२३




एम जी एम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय व अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विशेष श्रम संस्कार शिबीरात मतदार कुटुंबाचे व गावाचे मतदान शंभर टक्के होईल यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. यावेळी राष्ट्रिय सेवा योजनेच्या स्वयसेवकानी गावातील मुख्य चौकात पथ नाट्य सादर केले यात मतदानाची टक्केवारी वाढल्यास सक्षम उमेदवारांना नेतृत्व करण्याची संधी मिळेल, यामुळे सर्वंकष

विकास साधला जाईल. बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण होत आहे. मात्र महिलांनी देखील लोकशाहीचे समक्षमीकरणासाठी पुढे येण्याची गरज असल्याचा संदेश देण्यात आला.

## रक्तदान शिबीर





१४/०१/२०२३

एम जी एम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना आणि एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यांच्या सयुंक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन आडगाव येथे करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन प्रसंगी एमजीएमचे संचालक शिक्षण (कृषी) सुदाम पवार, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नरेंद्र चव्हाण, प्राचार्य डॉ. सोनल झंवर, प्राचार्य डॉ. निलेश मस्के, प्राचार्य डॉ. नरेंद्र चव्हाण, प्राचार्य डॉ. सोनल झंवर, प्राचार्य डॉ. निलेश मस्के, प्रा. डॉ. आर. एच. जाजू, पोलीस पाटील श्री. हाके, सर्व ग्रामपंचायत सदस्य, प्रतिष्ठित आणि ग्रामस्थ उपस्थित होते पोलीस पाटील श्री. हाके, सर्व ग्रामपंचायत सदस्य, प्रतिष्ठित आणि ग्रामस्थ उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन.आर.चव्हाण यांनी विद्यार्थ्यांच्या या स्तुत्य कार्यक्रमाबद्दल कौतुक केले व जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी रक्तदान करून रुग्णांचे प्राण वाचविण्याचे आवाहन केले. याप्रसंगी एमजीएम रक्त पेढीचे डॉ. ग्रीष्मा एन. जॉर्ज व डॉ. आशुतोष देव यांची उपस्थिती होती राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आणि ग्रामस्थ अशा एकूण ५० रक्तदात्यांनी रक्तदान केले. तत्पूर्वी रासेयो स्वयंसेवकांनी गावात पथनाट्य सादर करून रक्तदान आणि अवयवदान करण्याचे आवाहन केले

## सामाजिक कुप्रथा मोहीम

रासेयोच्या स्वयंसेवकाद्वारे ग्रामस्थांची सद्यस्थितील ज्वलंत सामाजिक प्रश्नाबद्दल जनजागृती करण्याच्या उद्देशाने पथनाट्य सादर करण्यात आले. विद्यार्थ्यांनी 'बाल विवाह -एक शाप' याविषयावरही पथनाट्य सादर केले.

## भ्रष्टाचार मुक्त भारत मोहीम







दिनांक १४ जानेवारी रोजी ग्रामसभेत सवर्साधारण सभेत स्वयंसेवकांनी गावकऱ्यांशी संवाद साधत भ्रष्टाचार मुक्त गाव आणि भ्रष्ट्राचार मुक्त प्रशासन या विषयावर बौद्धिक चर्चा घेतली यावेळी गावकऱ्यांच्या समस्या समजून घेताना प्रसार माध्यमाचा योग्य वापर भ्रष्टाचार आळा घालण्यासाठी शासनाने केलेल्या उपाययोजनांची माहिती ग्रामस्थांना दिली यावेळी उपसरपंच श्री. अशोक लोखंडे, पाटील श्री. हाके, सर्व ग्रामपंचायत सदस्य,

प्रतिष्ठित, ग्रामस्थ राष्ट्रीय सेवा योजनेचे ५० स्वयंसेवक, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा ऋषीकेश तहकिक, प्रा गणेश राऊत उपस्थित होते.

## शिबीर समारोप





१५ जानेवारी २०२३ रोजी शिबिराच्या अखेरच्या दिवशी गावाजवळील रामकृष्ण मिशन, ग्रामीण विकास केंद्राला भेट दिली तसेच त्याठिकाणी स्वच्छता अभियान राबविले. केंद्रातील स्वामी दिगंबर स्वामी यांनी स्वयंसेवकांना युवाशक्ती आणि आदर्श युवक कसा असावा या विषयावर विचारप्रबोधन केले. दुपारच्या सत्रात समारोप कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आडगाव चे सरपंच श्री. गोरख निकम हे होते. कार्यक्रमास एमजीएम कृषि व संलग्न महाविद्यालयांचे संचालक श्री. सुदाम पवार तसेच उपसरपंच श्री. अशोक लोखंडे, प्राचार्य डॉ. नरेंद्र चव्हाण, प्राचार्य डॉ. सोनल झंवर, प्राचार्य डॉ. निलेश मस्के, प्रा. डॉ. आर. एच. जाजू, पोलीस पाटील श्री. हाके, सर्व ग्रामपंचायत सदस्य, प्रतिष्ठित आणि ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना करतांना रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. जी. एस. राऊत यांनी शिबिरातील कार्याचा आढावा विषद केला. ग्रामपंचायतीच्या वतीने कार्यक्रमात बोलतांना ग्रामविकास अधिकारी श्री. चौधरी यांनी सात दिवसात स्वयंसेवकांनी केलेल्या सामाजिक आणि जनजागृतीपर कार्याचा विशेष उल्लेख करत स्वयंसेवकांचे कौतुक केले तसेच दोन स्वयंसेवकांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन प्रातिनिधिक सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बोलतांना, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. आर. आर. तहकिक यांनी स्वयंसेवकांनी सात दिवसाच्या विचारांची व कार्याची शिदोरी आयुष्यभर सोबत ठेऊन ग्राम व शहर विकासासाठी उत्स्फूर्त योगदान द्यावे असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वयंसेवक बळीराम पवार आणि ऋतुजा करडे यांनी केले तर आभार रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. आर. आर. तहकिक यांनी व्यक्त केले.

# वृत्तपत्रांनी घेतलेली दखल

## राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष सातदिवसीय श्रमसंस्कार शिबिराचे आडगाव येथे उद्घाटन



**औरंगाबाद/ प्रतिनिधी**
औरंगाबाद जिल्ह्यातील आडगाव येथे एम जी एम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय व एमजीएम अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, गाधेली, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या सात दिवसीय रा स यो श्रम संस्कार शिबीराचे उद्घाटन आज सकाळी ११:३० वाजता आयोजीत करण्यात आले होते.
या कार्यक्रमाचे आयोजन रा स यो एकक विद्यार्थी केले होते तर कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणुन सुदाम पवार, संचालक, एम जी एम हिल्स यांची उपस्थिती होती तर प्रसंगी एम जी एम कृषी जैवतंत्रज्ञान .महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ नरेंद्र चव्हाण, एम जी एम अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय प्राचार्या डॉ सोनल झंवर, एम जी एम नाना साहेब कदम कृषी महाविद्यालय प्राचार्य डॉ निलेश मस्के, गोरख निकम, सरपंच अशोक लोखंडे, उपसरपंच श्री. चौधरी, ग्राम विकास अधिकारीसर्व ग्रामपंचायत सदस्य ,विविध कार्यकारी सोसायटी आदी उपस्थित होते आडगाव ब्रु. औरंगाबादपासून १३ किमी अंतरावर आहे. या विशेष शिबिरात पन्नास एनएसएस स्वयंसेवक सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा जी एस राऊत यांनी तर आभारप्रदर्शन प्रा ऋषीकेश तहकिक यांनी केले.

लोकपत्र | विशेष | बुधवार दि. १८ जानेवारी २०२३

## एमजीएम राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिरात : मतदार जनजागृती अभि



## आडगांव बु. येथे सात दिवसीय रासेयो विशेष कार्यक्रम शिबीर संपन्न

**औरंगाबाद /प्रतिनिधी**
एमजीएम अन्नतंत्रज्ञान महाविद्यालय आणि एमजीएम कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ...



## आडगाव ब्रु.येथे एमजीएम रासयो एककाच्या वतीने राष्ट्रीय युवक दिन राष्ट्रमाता जिजाऊ जयंती विविध कार्यक्रमांनी साजरी

**औरंगाबाद/प्रतिनिधी**
युवकांनी स्वामी विवेकानंद यांचे विचार आणि आदर्श घेऊन स्वविकासाबरोबर राष्ट्राच्या विकासासाठी कार्य करावे तसेच त्यांच्या साहित्याचे सर्वांनी वाचन करावे असे आवाहन एमजीएम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय औरंगाबाद येथील प्रा. ऋषीकेश तहकिक यांनी केले. महात्मा गांधी मिशन अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय व कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या यांच्या संयुक्त विद्यमाने चालवल्या जाणाऱ्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या सातदिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिरात आयोजित राष्ट्रीय युवा दिन, स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ जयंती कार्यक्रम प्रसंगी प्रा ऋषीकेश तहकिक बोलत होते. या प्रसंगी व्यासपीठावर जिल्हा परीषद प्राथमिक शाळा आडगाव येथील मुख्याध्यापिका सौ. खरात, सरपंच गोरख निकम, उपसरपंच अशोक लोखंडे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा गणेश राऊत, श्री. हाके, पोलीस पाटील, श्री चौधरी, ग्राम विकास अधिकारी, ग्राम पंचायत सदस्य आदी मान्यवर, जिल्हा परीषद प्राथमिक शाळेचे विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ, अणि राष्ट्रीय सेवा योजनेचे ५० स्वयंसेवक उपस्थित होते.यावेळी एम जी एम अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय येथील जैव रसायन आणि अभियांत्रिकी विभागाचे विभागप्रमुख आणि राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा गणेश राऊत यांनी स्वामी विवेकानंद यांच्या आयुष्यातील प्रसंग विषद करताना कार्यक्षमता आणि प्रभावीपना याचे महत्व सांगत प्रेरणा, चैतन्य आणि उत्साहपूर्ण जीवनाचा अवलंब करून यशाकडे वाटचाल करावी असे प्रतिपादन केले.राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने या कार्यक्रमाअंतर्गत वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरव करण्यात आला. यावेळी स्वयं सेवकांनी जिल्हा परीषद प्राथमिक शाळेल वाचन प्रेरणा दिनानिमित्त पुस्तक भेट दिली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा ऋषीकेश तहकिक यांनी तर सूत्रसंचालन हर्षल काटकर आणि मोक्षदा गायकवाड व आभार प्रदर्शन रोहित तोर यांनी केले.



## एमजीएम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयात स्वछता पंधरवाडा साजरा



वृद्ध महिलेचे दीड तोळ्याचे दागिने लंपास

जलसंधारण प्रकल्पांच्या सीमानिश्चिती, खोलीकरण, उंची वाढविण्याची प्रक्रिया पूर्ण करण्याचे कृषिमंत्री सत्तार यांचे आदेश

राज्यातील कमी पटसंख्या असलेल्या १५ हजार शाळा बंद करण्याची मागणी – राठोड यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र